माहिती अधिकार

महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय,
कोंढवा-येवलेवाडी,पुणे महानगरपालिका.
कार्यालयाचा पत्ता :- जे.एस.पी.एम.बिल्डींग,
सावंत कॉर्नर,कात्रज, पुणे-४६.
कार्यालयाचा संपर्क क्र.:- ०२०-२५५०८८००
ईमेल :kondhwa@punecorporation.org
विस्तारित क्रमांक :- ०२०-२५५०८८०२/०३
जावक क्र. :- ६९७५ दिनांक :- १६/०१/२०२५

अपिल प्राधिकारी तथा महा.सहा.आयुक्त, कोंढवा-येवलेवाडी
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
अपिल क्र.:अ.प्रा.तथा महा.सहा.आयुक्त कार्यालय कोंढवा-येवलेवाडी /पुणे मनपा/अपिल/९०७८ दि.६/१/२०२५

१. अपिलकर्ता
पत्रकार श्री. मुज्जम्मील शेख
राहणार - ऑफिस नं. १, ओवेरा इनक्लेव सोसायटी,
चंदन मेडिकल समोर, चुडामन तालीम,
पुणे ४११००२
मोबाइल नं. ७८८७७७६६६८

२. श्री. सुनील मोरे ,
जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक
आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका.

श्री. मुज्जम्मील शेख
विरूध्द

श्री. सुनील मोरे, जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका.

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये अपिल**

अपिलकर्ता श्री. मुज्जम्मील शेख यांचा माहिती अधिकार अर्ज आ.क्र. ७६९५ दिनांक २९/११/२०२४ उप आयुक्त, घनकचरा व्यवस्थापन विभाग यांचेकडून कोंढवा येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालयाकडे प्राप्त झाला.

अपिलार्थी यांनी पुणे महानगरपालिकेच्या १५ क्षेत्रीय कार्यालयात कार्यरत असलेले सर्व आरोग्य निरीक्षक यांना आरोग्य कोठीच पदभार देणारे आज्ञापत्रक हे सहायक महापालिका आयुक्त अथवा उपायुक्त ज्यांच्या आदेशाने देण्यात येते त्याबाबतची माहिती पत्रक अथवा नियमावलीची प्रत मिळणे बाबत माहिती अधिकार अर्ज दाखल केला आहे.

सदर अर्जावर श्री. सुनील मोरे, जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, अस्थापना विभाग यांनी जा.क्र. ६१६६ दि. १९/१२/२०२४ अन्वये पुढील प्रमाणे कळविले " महापालिका सहाय्यक आयुक्त कोंढवा येवलेवाडी क्षेत्रीय कार्यालय यांच्या आदेशाने पारित केलेले कार्यरत आरोग्य निरीक्षक यांचे कार्यालयीन कामकाजाबाबत उपलब्ध कार्यालयीन आदेश व आज्ञापत्रक सोबत जोडून पाठवीत आहोत ."

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| माहिती अधिकारातर्गत अर्ज सादर केल्याचा आवक क्रमांक व दिनांक | माहिती उपलब्ध करून द्यावयाचा अंतिम दिनांक | अर्जदारास उत्तर पाठविल्याचा जावक क्रमांक व दिनांक | अर्जदाराने शुल्क भरल्याचा दिनांक | अर्जदारास माहिती दिल्याचा दिनांक |
| ७६९५<br>दि.२९ /११/२०२५ | २९/१२/२०२५ | जा.क्र. ६१६६<br>दि. १९/१२/२०२४ | निरंक | जा.क्र. ६१६६<br>दि. १९/१२/२०२४<br>अन्वये माहितीच्या प्रती सोबत जोडून पाठविल्या आहेत. |

**प्रथम अपिल अर्ज दाखल करण्याचे कारण** – श्री. मुज्जम्मील शेख यांनी अपिल अर्जात पुढीलप्रमाणे नमूद केले आहे–
" दिलेली माहिती असमाधानकारक आहे."

| प्रथम अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रथम अपिल अर्ज दाखल करावयाचा अंतिम दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज मुदतीत दाखल केला आहे का ? | प्रथम अपिलाच्या विलंबाबाबत निवेदन दिले आहे का ? | प्रथम अपिल सुनावणी सुचना पाठविल्याचा जावक क्र. दिनांक |
| १९/१/२०२५ | ६/१/२०२५ | होय | - | ६७५७<br>दि. १०/१/२०२५ |

प्रथम अपिल सुनावणी दिनांक व वेळ :- दि. १७/१/२०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता
सुनावणीस अपिलकर्ता :- उपस्थित
सुनावणीस जनमाहिती अधिकारी :- उपस्थित

जनमाहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | अर्जदाराने मागितलेली माहिती | जनमाहिती अधिकाऱ्याने दिलेले उत्तर/माहिती |
|---|---|---|
| १ | पुणे महानगरपालिकेच्या १५ क्षेत्रीय कार्यालयात कार्यरत असलेले सर्व आरोग्य निरीक्षक यांना आरोग्य कोठीच पदभार देणारे आज्ञापत्रक हे सहायक महापालिका आयुक्त अथवा उपायुक्त ज्यांच्या आदेशाने देण्यात येते त्यावावतची माहिती पत्रक अथवा नियमावलीची प्रत मिळणे बाबत माहिती अधिकार अर्ज दाखल केला आहे. | जा.क्र. ६१६६ दि. १९/१२/२०२४ अन्वये पुढील प्रमाणे कळविले "महापालिका सहाय्यक आयुक्त कोंढवा येवलेवाडी क्षेत्रीय कार्यालय यांच्या आदेशाने पारित केलेले कार्यरत आरोग्य निरीक्षक यांचे कार्यालयीन कामकाजा बाबत उपलब्ध कार्यालयीन आदेश व आज्ञापत्रक सोबत जोडून पाठवीत आहोत ." |

## विवेचन

माहिती अधिकार अर्जावरील सुनावणी मध्ये अपिलार्थींनी जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती असमाधानकारक आहे असे नमूद करून प्रथम अपील अर्ज दाखल केल्याचे सांगितले. यावर जन माहिती अधिकारी यांना विचारणा केली असता कार्यालयाकडील उपलब्ध माहिती अर्जदार यांना उपलब्ध करून दिल्याचे सांगितले.

यावर अपिलार्थी यांनी, जन माहिती अधिकारी यांनी जे आज्ञापत्रक उपलब्ध करून दिले त्याबाबतची नियमावली तसेच आरोग्य निरीक्षक यांच्या नेमणुका कोणाच्या आदेशान्वये केल्या जातात याबाबत यांनी विचारणा केली.

यावर अपिलार्थी यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील तरतुदी विषयी माहिती देण्यात आली. अपिलार्थी यांनी सदर नियमावलीची प्रत उपलब्ध करून देण्याविषयी सांगितले.

## -: आदेश :-

जन माहिती अधिकारी तथा आस्थापना विभाग श्री. सुनील मोरे यांनी अपिलार्थींनी माहिती अधिकार अर्जात नमूद केल्यानुसार तसेच विवेचन मध्ये नमूद केल्याप्रमाणे अपील सुनावणी दरम्यान झालेल्या चर्चेनुसार कार्यालयाकडील उपलब्ध माहिती अपिलार्थी यांना पुढील ७ दिवसात विनामुल्य उपलब्ध करून देण्यात यावी व त्याबाबतचा अहवाल आमचेकडे सादर करावा.

सबब सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

17/1

( लक्ष्मण कादवाने )
अपिल प्राधिकारी तथा प्र.महा.सहा.आयुक्त
कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालय
पुणे महानगरपालिका

दिनांक आणि ठिकाण: , पुणे.

टीप :- १.सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास माहिती अधिकार अधिनियम कलम १९(३)नुसार मा.आयुक्त,राज्य माहिती आयोग,नविन प्रशासकिय इमारत,विधानभवन समोर पुणे ४११००१ यांचेकडे अपिल करता येईल.